महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे
महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ कार्यालय इमारत
(दुसरा व चौथा मजला) सर्व्हे नं. ८३२ ए, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे-४ दूरध्वनी क्र.:-०२०-29709617/29709396 वेबसाइड:-mscepune.in ई-मेल :-mscegcctbc@gmail.com

जा.क्र.मरापप/जीसीसी/प्रशा/आ.४/२०२५/155 दिनांक :-२३/०९/२०२५

## प्रसिद्धी पत्रक

### विषय–मशीन टायपिंग परीक्षा डिसेंबर-2025 स्थगित करणेबाबत...

शालेय शिक्षण व क्रिडा विभागाचे शासन निर्णय दि.५ डिसेंबर,२०१६ अन्वये प्रसिध्द महाराष्ट्र वाणिज्य शिक्षण संस्था (टंकलेखन,लघुलेखन आणि संगणक टंकलेखन अभ्यासक्रम) मान्यता व संचालन नियम,१९९१ ची सुधारित नियमावली,२०२३ अन्वये टंकलेखन,लघुलेखन आणि संगणक टंकलेखन संस्थांचे संचलन व सनियंत्रण केले जाते. सध्यस्थितीत राज्यामध्ये ३१७९ मॅन्युअल/मशीन टंकलेखन संस्थांची नोंदणी असली, तरी त्यापैकी जास्तीत जास्त म्हणजे ३०१३ संस्था या संगणक टंकलेखन संस्थांमध्ये परावर्तित झालेल्या आहेत.

मॅन्युअल/ मशीन टायपिंग कोर्स हा कालबाह्य झाला. त्याऐवजी संगणक टायपिंग, डिजिटल कौशल्ये आणि इतर आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित कोर्सेसना प्राधान्य दिल्यास विद्यार्थी अधिक सक्षम बनतील आणि त्यांना नोकरीच्या संधी अधिक मिळतील. या पार्श्वभुमीवर राज्यातील शासनमान्य वाणिज्य संस्थांमध्ये संगणक टंकलेखन अभ्यासक्रम सुरु करणेबाबत दि.३१/१०/२०१३ च्या शासन निर्णयान्वये निर्णय घेतला होता. संगणक टंकलेखन अभ्यासक्रम सुरु करत असताना मॅन्युअल टंकलेखन अभ्यासक्रम दि.३०/११/२०१५ पर्यंत टप्प्याटप्प्याने बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. तथापि, यानंतर दि.३०/०९/२०१५ च्या शुध्दीपत्रान्वये मॅन्युअल टंकलेखन अभ्यासक्रमास दि.३१ मे २०१६ पर्यंत मुदत वाढ देण्यात आली. यानंतर दि.१३ जुलै २०१६ च्या शुध्दीपत्रान्वये मॅन्युअल टंकलेखन अभ्यासक्रमास दि.३१ मे २०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली.

मॅन्युअल/ मशीन टंकलेखन बंद करण्याच्या शासनाच्या विरोधारात मा.उच्च न्यायालयात काही याचिका दाखल झाल्या होत्या.त्यापैकी रिट याचिका क्र.१०२७३/२०१७ व जनहित याचिका क्र.१००/२०१६ मध्ये मा.उच्च न्यायालयाने याचिका कर्त्यांना त्यांचे म्हणणे शासनाकडे सादर करण्याबाबत निर्देश दिले होते व शासनाने याचिका कर्त्यांच्या निवेदनाबाबत विचार विनिमय करुन निर्णय घ्यावा,असे निर्देश शासनास दिले होते. त्यानुसार दि.१६ नोव्हेंबर २०१७ च्या शासन निर्णयानुसार ३० नोव्हेंबर २०१९ पर्यंत मॅन्युअल टंकलेखन अभ्यासक्रम सुरु ठेवण्यास शासनाने मान्यता दिलेली होती. या दरम्यान सर्व शासनमान्य टंकलेखन व लघुलेखन वाणिज्य संस्थांनी मॅन्युअल टंकलेखन सोबतच संगणक टंकलेखनाचा अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी आवश्यक बदल संस्थांमध्ये करुन घ्यावेत व दि.३० नोव्हेंबर २०१९ नंतर संगणक टंकलेखन अभ्यासक्रम सुरु झाल्याचा आढावा घेवून मॅन्युअल टंकलेखन सुरु ठेवण्याबाबत पुढील निर्णय घ्यावयाचा होता. तथापि,शासन निर्णय क्रमांक :- संकीर्ण-२०१९ /प्र.क्र.२२०/एसडी-२,दि. २३ ऑगस्ट २०१९ नुसार मॅन्युअल टायपिंग साठी मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

सामान्य प्रशासन विभाग (माहिती व तंत्रज्ञान) शासन पुरकपत्र दि.१६ जुलै २०१८ नुसार बेसिक कोर्स इन कॉम्प्युटर टायपिंग मराठी/हिंदी/इंग्रजी ३० व ४० श.प्र.मि.या अभ्यासक्रमाचे प्रमाणपत्र धारक कर्मचाऱ्यांना संगणक अर्हता परीक्षा उत्तीर्ण असल्याचे

समजण्यात येते. मागील पाच वर्षाच्या परीक्षेतील प्रविष्ठ उमेदवारांची संख्या पाहिल्यास मॅन्युअल टायपिंगसाठी संख्या लक्षणीयरित्या कमी होत आहे.

मागील पाच वर्षात मॅन्युअल/ मशीन टंकलेखन व संगणक टंकलेखन परीक्षेला प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांची सांख्यिकीय माहिती पुढीलप्रमाणे आह :-

| अ.क्र. | वर्ष व महिना | विद्यार्थी संख्या (संगणक) |
|---|---|---|
| १. | जानेवारी - २०२० | १,७३,९७४ |
| २. | मार्च - २०२१ | १,१७,११७ |
| ३. | ऑक्टोबर- २०२१ | १,१८,३२१ |
| ४. | जुलै - २०२२ | २,३७,३१९ |
| ५. | फेब्रुवारी - २०२३ | १,९७,८७१ |
| ६. | जुलै - २०२३ | १,७७,६२० |
| ७. | डिसेंबर - २०२३ | ६६९८१ |
| ८. | जून - २०२४ | १,६५,३८० |
| ९. | डिसेंबर - २०२४ | १,३५,३८० |
| १०. | जुलै - २०२५ | १,८७,३१८ |

| अ.क्र. | वर्ष व महिना | विद्यार्थी संख्या (मॅन्युअल) |
|---|---|---|
| १. | जानेवारी - २०२० | ५९,३३० |
| २. | फेब्रुवारी- २०२१ | ४६,३५९ |
| ३. | ऑक्टोबर- २०२१ | ४६,३०२ |
| ४. | जुलै - २०२२ | ५०,५५३ |
| ५. | फेब्रुवारी - २०२३ | ४७,६१९ |
| ६. | जुलै - २०२३ | २८,७०३ |
| ७. | डिसेंबर - २०२३ | ७,६९९ |
| ८. | जून - २०२४ | ९,०१७ |
| ९. | डिसेंबर - २०२४ | ३,६७८ |
| १०. | जुलै - २०२५ | २,१०७ |

एकंदरीत वरील माहितीचे बारकाईने विश्लेषण केल्यास असे दिसून येईल की, जून 2015 मधील मशीन टंकलेखन परीक्षेमध्ये प्रविष्ट झालेल्या 3,59,285 विद्यार्थी संख्येच्या तुलनेत जून,2025 मध्ये 2107 म्हणजेच अवघे 0.58% विद्यार्थी प्रविष्ट झाल्याचे दिसून येईल .याउलट जून 2016 मधील संगणक टंकलेखन परीक्षेमधील 7865 प्रविष्ट झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या वाढून जून, 2025 मध्ये 1,87,147 इतकी झाली आहे.

## मशीन टायपिंग परीक्षा स्थगित ठेवण्यासाठीची कारणे पुढीलप्रमाणे आहेत -:

१).संगणक टायपिंग प्रमाणपत्र परीक्षेमध्ये इंग्रजी ५० व ६० श.प्र.मि.या अभ्यासक्रमाचा समावेश नसल्याने मॅन्युअल टायपिंग परीक्षा चालू ठेवण्यात आलेल्या होत्या. महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, शासन आदेश क्र.संकीर्ण ३८२४/प्र.क्र.२३/एसडी-२, दि.१४/१०/२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये संगणक टायपिंग प्रमाणपत्र परीक्षेमध्ये इंग्रजी ५० व ६० श.प्र.मि. अभ्यासक्रम चालू करण्यात आलेला आहे. मशीन टाइपिंगमधील सर्वच कोर्सेस हे संगणक टंकलेखन अभ्यासक्रमात समाविष्ट झालेले असल्यामुळे मशीन टायपिंग कोर्स मधील सर्व विषयांची उपयुक्तता संपुष्टात आलेली आहे.

२). मशीन टाइपराइटर बनवणाऱ्या उदा.Halda, Remington, Godrej, Facit इत्यादि कंपन्यांनी मशीन टाइपराइटरची निर्मिती बंद केलेली आहेत .टाइपराइटर मशीनचे सुटे भाग /स्पेअर पार्ट, रिबन देखील मिळत नाही. दुरुस्तीसाठी मेकॅनिक मिळत नाहीत.

३). कोणत्याही शासकीय किंवा खासगी कार्यालयामध्ये टाइपराइटर यंत्राचा वापर पूर्णपणे बंद करण्यात आलेला असून त्याची जागा संगणकाने घेतलेली आहे. शासनाच्या सर्व विभागामध्ये ई-गव्हर्नन्स पध्दत अवलंबण्यात येत असल्याने संगणकीय टंकलेखनाचा सराव असलेला कर्मचारी वर्ग उपलब्ध असणे आवश्यक आहे. सर्व स्पर्धा/ भरती परीक्षा या संगणकावरच होत आहेत. त्यामुळे आधुनिक काळात संगणकीय टंकलेखन व संगणकाचा वापर खाजगी व शासकीय कार्यालयासाठी अनिवार्य झालेला आहे.

४).जून,2025 मधील मशीन टायपिंग परीक्षेमध्ये एकूण 2107 विद्यार्थ्यांपैकी 750 विद्यार्थी गैरहजर होते, 728 विद्यार्थी नापास झाले व केवळ 627 विद्यार्थी पास झाल्याचे आढळून आले आहे. हीच आकडेवारी डिसेंबर,2024 मधील परीक्षेची पहिल्यास,एकूण 3678 विद्यार्थ्यांपैकी 1435 विद्यार्थी गैरहजर होते, 1639 विद्यार्थी नापास झाले व केवळ 587 विद्यार्थी पास झाल्याचे आढळून आले आहे.

५). जून, 2025 ज्या मशीन टायपिंग परीक्षेमध्ये ज्या 137 संस्थांनी विद्यार्थी प्रविष्ट केले होते, त्यापैकी 116 संस्था या संगणक टंकलेखनासाठी नोंदणीकृत असून त्यांनी तब्बल 1426 विद्यार्थी प्रविष्ट केले होते. सदर बाब निश्चितच गंभीर असून संगणक अहर्ता उपलब्ध असताना जाणीवपूर्वक गैरप्रकार करण्याच्या उद्‌देशाने त्यांनी सदर विद्‌यार्थी प्रविष्ट केल्याचे स्पष्ट होते. या वरून मशीन टंकलेखन परीक्षा बंद केले, तर या संस्था आपोआपच मशीन टंकलेखन ऐवजी संगणक टंकलेखनाकडे विद्‌यार्थी प्रविष्ट करतील. आश्चर्याची बाब म्हणजे केवळ मशीन टंकलेखन नोंदणी असलेल्या संस्था कोड क्र.31282- नागाई टाइपरायटिंग इन्स्टिट्यूट, नांदगाव व 31303-साई टाइपिंग इंस्टीट्यूट,नाशिक यांनी अनुक्रमे 162 व 234 विद्यार्थी प्रविष्ट केले असताना, प्रत्यक्षात परीक्षेसाठी मात्र एकही विद्यार्थी हजर राहिलेला नाही. याचाच अर्थ परीक्षेच्या वेळी गैरप्रकार करायला मिळतील, डमी विद्‌यार्थी बसविता येतील म्हणूनच या संस्थांनी एवढ्या मोठ्या संख्येने विद्‌यार्थी प्रविष्ट केले होते.म्हणजेच मशीन/मॅन्युअल टायपिंगसाठी विद्यार्थी प्रविष्ठ करुन संस्थाचालक विद्यार्थ्यांची फसवणूक करित आहेत.

६). मागील दोन वर्षांमध्ये मशीन टाइपिंगच्या परीक्षेदरम्यान महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेकडून कर्मचारी तपासणीकरिता पाठविले असता विद्याथ्यांना मशीन टाइपराइटर मध्ये कागद देखील टाकता येत नसल्याचे दयनीय चित्र पहावयास मिळाले .मशीन टाइपिंग सुरू ठेवले, तर अशा प्रकारचे गैरप्रकार पुढेदेखील कायम राहण्याची शक्यता नाकारता येत नाही.

७).मालेगाव (नाशिक) या केंद्रावर बाहेरील जिल्हयातील विद्यार्थी प्रविष्ठ होण्याचे प्रमाण अधिक असल्याने जून,२०२४ च्या परीक्षेसाठी या कार्यालयामार्फत निरीक्षकाची नेमणूक करण्यात आलेली होती. त्या वेळी सदर परीक्षा केंद्रावर असे निदर्शनास आले कि, परीक्षेसाठी विद्यार्थी अधिक संख्येने अनुपस्थितीत राहतात किंवा उपस्थित राहिल्यास उत्तरपत्रिका कोऱ्याच ठेवतात.

८).डिसेंबर,२०२४ च्या परीक्षेसाठी छत्रपती संभाजीनगर या केंद्रावर या कार्यालयामार्फत निरीक्षकाची नेमणूक करण्यात आलेली होती. त्या वेळी सदर परीक्षा केंद्रावर तोतया विद्यार्थी परीक्षेस बसल्याचे आढळले. त्यावेळी तोतया विद्यार्थ्यांवर फौजदारी गुन्हे देखील दाखल करण्यात आलेले आहेत.

९).या कार्यालयामार्फत जून,२०२५ च्या परीक्षेसाठी दोन लिपीक व सहा.आयुक्त यांना मालेगाव (नाशिक) या परीक्षा केंद्रावर निरीक्षक म्हणून पाठविण्यात आलेले होते. सदर केंद्रावर मालेगाव मधील ४०२ व नाशिक जिल्हयातील २० असे एकूण ४२२ विद्यार्थी प्रविष्ठ झालेले होते. परंतु परीक्षेसाठी फक्त **१२** च विद्यार्थी उपस्थित राहिलेत. **मालेगाव येथील मशीन टंकलेखन संस्थांमधील** ४०२ विद्यार्थ्यांपैकी नाशिक जिल्हयाव्यतिरिक्त इतर (पुणे, सातारा, मुंबई, लातूर,नंदुरबार, धुळे,जळगाव, सोलापूर, रायगड, ठाणे इ.) जिल्हयातील विद्यार्थी प्रविष्ठ होते. सदर विद्यार्थ्यांच्या प्रवेशपत्रावर फोटो व संस्थाचालकाची सही व शिक्का आढळून आला नाही. विद्यार्थ्यांबरोबर विचारपूस केली असता, परीक्षा केंद्राच्या गेट बाहेर असलेला त्रयस्थ व्यक्ती विद्यार्थ्यांच्या प्रवेशपत्रावर शिक्के मारत असल्याचे आढळून आले. सदरील केंद्रावर प्रवेशपत्र तपासणी केल्यामुळे **गैरप्रकार उघडकीस येण्याच्या भीतीने** अनेक विद्यार्थी अनुपस्थितीत राहिलेत.

१०).डिसेंबर २०२३ च्या परीक्षेसाठी या कार्यालयामार्फत पालघर जिल्हयाच्या परीक्षा केंद्रावर निरीक्षकाची नेमणूक करण्यात आलेली होती. त्या वेळी सदर परीक्षा केंद्रावर असे निदर्शनास आले कि, दि.०८/१२/२०२३ रोजी पहिल्या दिवशी एकूण २४५ पैंकी तीन सत्राचे मिळून ७९ विद्यार्थी उपस्थित राहिले. दि.०९/१२/२०२३ रोजी एकूण २२० पैंकी एकही विद्यार्थी परीक्षेसाठी केंद्रावर उपस्थित नव्हता. तसेच सदरील केंद्रावरील संस्थाचालकांनी ठेवलेल्या मशीन्स नादुरुस्त व रिबन नसलेले आढळून आल्या. जून,२०२४ च्या परीक्षेसाठी या कार्यालयामार्फत पालघर जिल्हयाच्या परीक्षा केंद्रावर निरीक्षकाची नेमणूक करण्यात आलेली होती. त्या वेळी सदर परीक्षा केंद्रावर असे निदर्शनास आले कि, दोन दिवसाच्या परीक्षा कालावधीतील २५६ विद्यार्थ्यांपैकी फक्त १५ विद्यार्थी परीक्षेसाठी उपस्थित राहिले.

११).या परीक्षेसाठी पेपर सेटिंग करणे, प्रिंटिंग करणे, प्रश्न संचिका तयार करण्यासाठी व तपासण्यासाठी कार्यशाळा घेणे, प्रश्न पत्रिका व इतर साहित्य परीक्षा केंद्रावर पोहचविणे, परीक्षा केंद्रावरील पर्यवेक्षकांचे व समवेक्षकांचे मानधन देणे, उत्तरपत्रिका मूल्यमापन केंद्रावर पोहचविणे, निकाल तयार करणे इत्यादी मुद्द्यांसाठी मोठ्या प्रमाणावर खर्च येत आहे. संगणक टंकलेखन परीक्षेचे परीक्षा शुल्क रु.1000/- असून मशीन टंकलेखन परीक्षेचे परीक्षा शुल्क मात्र अवघे रु.500/- आहे. विद्यार्थी संख्या अत्यल्प असल्यामुळे परीक्षा परिषदेला सदर परीक्षा घेणे आर्थिकदृष्ट्या परवडत नाही.

12). मशीन टंकलेखन परीक्षा बंद करावी यासाठी अनेक संस्थाचालकांकडून व जिल्हा संघटनांकडून निवेदने पत्र प्राप्त झालेली आहेत. महाराष्ट्र राज्य संगणक टंकलेखन संघटनेनेदेखील प्रत्यक्ष सभेमध्ये अनेकवेळा मशीन टंकलेखन परीक्षा बंद करणेबाबत विनंती केलेली आहे.

13).काही जिल्ह्यांमध्ये तर मशीन टायपिंग परीक्षा अनेक वर्षांपासून बंद झालेल्या आहेत. उदा.सातारा, धुळे, नंदुरबार, अहिल्यानगर या जिल्ह्यांमधून मागील अनेक वर्षांपासून एकही विद्यार्थी मशीन टंकलेखन परीक्षेसाठी प्रविष्ट झालेला नाही.

एकंदरीत वरील नमूद केलेल्या मुद्द्यांचा सारासार विचार करता यापुढे मॅन्युअल/ मशीन टंकलेखनाची परीक्षा न घेण्याचा म्हणजेच स्थगित करण्याचा निर्णय परीक्षा परिषदेने घेतलेला आहे. सर्व संस्थाचालकांनी याबाबतची नोंद घेऊन सध्या सुरु असलेल्या संगणक टंकलेखन परीक्षेच्या नोंदणीमध्ये (19 सप्टेंबर ते 19 ऑक्टोबर,2025) आपल्याकडील मशीन टंकलेखनाच्या विद्यार्थ्यांना प्रविष्ट करावे असे आवाहन करण्यात येत आहे.

दिनांक : 23/09/2025
स्थळ : पुणे

डॉ.नंदकुमार बेडसे (भा.प्र.से),
अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,पुणे.